# दीपावलीची तुमची कविता पाठवा

७ नोव्हेंबर, २०२३

प्रिय वाचक,

शुभ दीपावली!

मला वाटते की कदाचित माझ्याप्रमाणे तुम्हीदेखील श्रीगुरुमाईंनी दीपावलीसाठी लिहिलेल्या कवितेत निहित असलेला प्रकाश, प्रेम आणि प्रज्ञान यांच्या अपरिमिततेत आल्हादित होत आहात. मी ही कविता वारंवार वाचते आहे—कधी प्रकाशाने चमचमणारे हे वाक्य पुन्हा वाचते तर कधी ते वाक्य, अनपेक्षित अशा चित्रावलीमध्ये आनंदित होते, प्रत्येक पद्यात दडलेल्या अनेक अर्थांवर चिंतन करते. मला असे वाटते की, जणूकाही गुरुमाईंची ही कविता आपल्याला जीवन जगण्याच्या पद्धतीशी परिचित करविते आहे, जणूकाही ही अत्यंत उत्कृष्टरीत्या लिहिलेली पुस्तिका आहे, जी हे सांगते की, या जगात कसे राहावे.

या समयी लाखो लोक—भारतवासी आणि जिथे भारतीय वंशाचे लोक राहतात तेदेखील—दीपावली आणि नूतन वर्षाचा उत्सव साजरा करत आहेत. दीपक प्रज्वलित झाले आहेत. लोक थाळ्यांमध्ये, नाजूक चांदीच्या वर्खाने सजलेल्या, केशर व पिस्ते घालून बनवलेल्या मिठाया एकमेकांना देत आहेत. सर्वांचीच अशी इच्छा आहे की, काहीतरी नवीन असावे, काहीतरी नवेनवे असावे, की त्यांनी एका अधिक उज्ज्वल आणि आशादायी भविष्याचे स्वागत करावे.

मला असे वाटते की, गुरुमाईंची ही कविता नावीन्याची ही इच्छा मान्य करते आणि त्याबरोबरच ती पूर्णदेखील करते. मी अशी कविता याआधी कधीच वाचली नाही, जी असाधारण आहे, न केवळ यामुळे की ही कविता ज्ञान प्रदान करते, तर हिची संरचना, हिची रूपरेषा, हिच्या प्रस्तुतीचे डिझाइन यांमुळेदेखील—अशी कला जी कवितेमध्ये प्रयुक्त भाषा आणि तिच्या आशयापासून वेगळी नाही. तुम्ही पाहिले असेल की, कवितेच्या सर्वात वर, पानांपासून बनलेले आणि देवनागरी वर्णाच्या आकारानुसार

कमळाच्या फुलाने अलंकृत असे एक प्रतीक आहे, हे प्रतीक आहे ‘श्री’चे. ‘श्री’ हे देवी महालक्ष्मीचे एक नाव आहे जिचे गुरुमाईंनी आपल्या कवितेत अतिशय लालित्यपूर्ण शैलीने स्तुतिगान केले आहे.

तेव्हा खरोखरच, ही कविता रोमहर्षकपणे अनोखी आहे. हिच्यात एक धारणा समाविष्ट आहे, जी तुम्ही हिंदी किंवा इंग्रजीमध्ये कवितेचे रेकॉर्डिंग ऐकताना, कवितेचा एक भाग म्हणून ऐकू शकता किंवा **धारणेचे रेकॉर्डिंग वेगळे ऐकू शकता.** तुम्ही मराठीमध्येदेखील ही धारणा वाचू शकता. हिच्यात एक अतिशय उत्साहपूर्ण निमंत्रणदेखील समाविष्ट आहे—श्रीगुरुमाई तुम्हाला आमंत्रित करत आहेत की, दीपावलीकरिता तुम्ही स्वतः कविता लिहाव्यात.

या अति विशेष आमंत्रणाविषयी काही सांगण्यास मी आणखी थोडा वेळ घेऊ इच्छिते. दीपावली प्रकाशाचा सण आहे आणि गुरुमाई तुम्हाला त्या कार्यांविषयी कविता लिहिण्यासाठी प्रेरित करत आहेत, जी कार्ये तुम्ही तुमच्या जीवनात आणि जगतात प्रकाश आणण्यासाठी केली आहेत, जी तुम्ही करत आहात आणि जी तुम्ही करणार आहात. तुमच्या लेखनाला प्रेरणा मिळावी यासाठी गुरुमाईंनी **त्यांच्या कवितेत काही विशिष्ट प्रश्नदेखील दिले आहेत ज्यांवर तुम्ही लक्षपूर्वक विचार करू शकता.**

गुरुमाईंनी मला सांगितले की, जेव्हा त्या ही कविता लिहित होत्या आणि कविता लिहितालिहिता त्या या भागावर पोहोचल्या, तेव्हा त्यांना वाटले की, जणूकाही या विषयावर त्या एक संपूर्ण *पुस्तक* लिहू शकतात. पण मग त्यांनी विचार केला, “तसे तर होऊ शकत नाही. महोत्सवाच्या या कवितेमध्ये एक संपूर्ण पुस्तक तर सामावू शकत नाही!”

मग गुरुमाईंनी विचार केला, “सिद्धयोग मार्गावर तर जगभर माझे भक्त आणि साधक आहेत! *ते* याविषयी खूप काही लिहू शकतात. आणि जर त्यांनी असे केले, तर किती अद्‌भुत होईल! प्रत्येकाकडे सांगण्याकरिता एक निराळा दृष्टिकोण आहे, आपले हृदयस्थ प्रेम इतरांपर्यंत पोहोचवण्याची प्रत्येकाची स्वतःची अशी पद्धत आहे, या जगताला योगदान करण्याची त्यांची एक पद्धत आहे.”

गुरुमाईंनी तुम्हा सर्वांसाठी काही सुचवलेदेखील आहे आणि त्यांनी सांगितले की, ते मी तुमच्यापर्यंत पोहोचवावे. तुम्ही कविता लिहिण्याची तयारी जेव्हा कराल, तेव्हा तुम्ही धारणेचा आधार घेऊ शकता. धारणा केल्याने तुम्हाला तुमच्या अंतरीच्या त्या स्थानापर्यंत पोहोचावयास मदत होईल, जिथून प्रेरणा, अंतर्दृष्टी आणि रचनात्मकता उदयास येतात. आणि मग तुम्ही जे काव्य-लेखन कराल ते म्हणजे केवळ एक मानसिक अभ्यास नसेल, तर ती कविता तुमच्या अंतरातून स्फुरलेली असेल. तो हृदयाचा उद्‌गार असेल.

तुमच्या कविता लिहून पूर्ण झाल्यावर तुम्ही त्या सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पाठवू शकता. त्यांतील काही कविता वेबसाइटवर प्रकाशित होतील, जेणेकरून सर्वांना तुमच्या अनुभवांचा आनंद घेता येईल आणि त्या अनुभवांनी सगळे लाभान्वित होतील.

मी तर तुमच्या कविता वाचण्याची आतुरतेने वाट पाहते आहे. वास्तवात, समापनाचे हे शब्द लिहिताना मी पाहते आहे की, तुमच्या चेहऱ्यावर हास्य पसरले आहे.

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.